१० वा वार्षिक अहवाल

# छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

## वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

आपल्या **छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. कोल्हापूर** या संस्थेची **१० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ००/००/२०२३ इ. रोजी सायंकाळी ६ वा. ।। श्री लॉन ।।, १०४१/१, श्रीपतराव पोवार नगर, नवीन वाशी नाका, राधानगरी रोड, कोल्हापूर** येथे बोलविणेत आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस सहभागी व्हावे, ही विनंती.

### - सभेपुढील विषय -

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२) सन २०२२-२३ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रके वाचून मंजूर करणे.

३) सन २०२१-२३ या सालात झालेल्या खर्चास व बजेटपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे. तसेच सन २०२३-२४ सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

४) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२-२३ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे.

५) सन २०२२-२०२३ अखेरच्या शासकीय लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे.

६) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखा परीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांचे मानधन ठरवणे.

७) अंगणवाडी सुपरवायझर, ग्रामसेवक, माध्यमिक शिक्षक व जिल्हा परिषदेचे इतर कर्मचारी यांना सभासद करून घेणेबाबत.

८) मासिक वर्गणी न येणाऱ्या सभासदांचे सभासदत्व रद्द करणेबाबत.

९) मा.अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेवरून

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : ००/००/२०२३

| श्री. मनोज नामदेवराव माळवदकर | श्री. बाबुराव रामचंद्र खोत | श्री. सातापा विष्णू पाटील(एस.व्ही.) |
|---|---|---|
| मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

व सर्व संचालक मंडळ

**टीप :-**

१) ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील त्यांनी लेखी प्रश्न शुक्रवार, दि. ००/००/२०२३ पर्यंत सायं. ७ वा. पर्यंत पतसंस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

२) सर्व सभासदांनी सभेसाठी सहभागी व्हावे.
सभास्थळी सर्वांच्या शाकाहारी/मांसाहारी भोजनाची व्यवस्था केली आहे.

# श्रद्धांजली

अहवाल सालात दिवंगत झालेले सन्माननीय सभासद, त्यांचे नातेवाईक, ठेवीदार, हितचिंतक तसेच जागतिक व भारतीय कीर्तिचे थोर विचारवंत, सहकारधुरीण, शिक्षणतज्ञ, समाजसेवक व आपल्या भागातील नागरिक आणि विविध दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले निष्पाप लोक यांना संस्थेच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली ! त्यांच्या आत्म्यास चिरशांती मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना. आजची ही सभा सर्वांना नम्रतापूर्वक अभिवादन करून त्याच्या प्रती भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

## बँकर्स

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,
शाखा – बिंदू चौक, कोल्हापूर.
खाते नंबर – ०३०४१०००११००००४
IFSC Code : IBKL 0463 KDC

दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक,
मुख्य शाखा – करवीर.
खाते नंबर – ०००२११०५२०००२७२
IFSC Code : IBKL 0464 PSS

।। जय सहकार ।।



सन २०२२-२०२३ सालचा

# १० वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,**

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो, सन २०२२-२०२३ सालच्या १० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने शिवाजी शिक्षक पतसंस्थेच्या परिवारातील सदस्य म्हणून आपण सहभाग नोंदवलात, त्याबद्दल संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

मित्रहो, सहकार हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. म्हणूनच आपण 'विना सहकार नही उद्धार' या म्हणीचा सातत्याने वापर करतो. यासाठी सहकार कायदा हा केवळ संस्थांना आर्थिक शिस्त लावण्यासाठी निर्माण झाला आहे. म्हणून आपण चालवत असलेल्या छ. शिवाजी शिक्षक पतसंस्थेचे पावित्र्य अबाधित राखून त्या माध्यमातून सभासदांचे हित जोपासत त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा किंबहुना सर्वांगीण विकास करावा यासाठीच संस्था कार्यरत राहून काम करत आहे.

सहकार खात्याच्या निकषानुसार संस्थेने केलेल्या आदर्शवत व पारदर्शक कारभाराची पडताळणी होऊन **संस्थेला रुपये २५ लाख सर्वसाधारण कर्ज, ५ लाख आकस्मिक कर्ज, रुपये १ लाख हायरपर्चेस कर्ज, १ लाख अल्पमुदत कर्ज असे रुपये ३२ लाख** कर्जास मान्यता मिळाल्याने सभासदांची गरज व मागणी लक्षात घेऊन त्याप्रमाणे कर्जवाटपही सुरू केले आहे. **सभासदांना वरीलप्रमाणे कर्जपुरवठा करताना संस्थेने कोणत्याही वित्तीय संस्थेचे कर्ज न घेता जमा ठेवीतूनच ही कर्जे दिली आहेत. ही बाब संस्थेस भूषणावह आहे.**

आपल्या संस्थेला प्रत्यक्षात काम करण्यास **९ वर्षे एवढा कमी कालावधी** मिळूनही मिळालेल्या कालावधीत अनेक

वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन

अडचणींचा सामना करत, सर्वांचा विश्वास संपादन करत पहिल्या वर्षापासून **सभासदांना १०% डिव्हिडंड व चालू वर्षी १५% डिव्हिडंड** तसेच प्रत्येक सभासदाला **दिवाळी भेट, कायम ठेव व मासिक वर्गणीवरील व्याज** देऊन त्यांचा संस्थेवरील विश्वास द्विगुणित करण्याचे काम सातत्याने केले आहे.

यापुढेही आपली संस्था सभासदांच्या हिताचाच पारदर्शक कारभार करत राहील याची मी तुम्हांला ग्वाही देतो व आपणासमोर दि. ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या सहकार वर्षातील कामकाजाचा अहवाल, तेरीज, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व अंदाजप

तत्कालिन परिस्थितीत संस्थेच्या उभारणीसाठी आपण सर्वांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता खूप सहकार्य तर केलेच, पण भक्कम पाठबळही दिलत, त्यामुळेच तुम्हाला विनंती करतो की, आपण संस्था प्रगतीसाठी व सभासदांच्या हितासाठी या मिटींगमध्ये विधायक सूचना कराव्यात.

### उद्देश :-

सहकार तत्व कायदा कानून यास अनुसरून शेअर्स व ठेवीच्या रूपाने भांडवल जमा करून सभासदांच्या गरजेसाठी विविध प्रकारे व त्यांच्यामध्ये काटकसर, स्वावलंबन व परस्पर सहकार्याची भावना निर्माण करून समाजात त्यांची पत उंचावणे.

### सभासद संख्या :- (३३२)

दि. ३१ मार्च २०२२ अखेर सभासद संख्या ३१० होती त्यामध्ये २२ सभासदांची वाढ होऊन ३३२ इतकी सभासद संख्या झाली आहे. शिवाय नवीन सभासदत्व मागणीसाठी १३ लोकांचे अर्ज प्रलंबित आहेत. शिवाय कोणत्याही कारणाने सभासदत्व रद्द न झालेने एकूण सभासद संख्या ३३२ झालेली आहे.

### सभासद भागभांडवल :- (रु. ५,४५,७३०/-)

दिनांक ३१ मार्च २०२२ अखेर संस्थेचे भागभांडवल रु. ५,१७,८३०/- इतके होते. अहवाल सालात सभासदांच्या कर्जवाटपातून रु. २७,९१०/- ची शेअर्समध्ये वाढ झाली असून वर्षाअखेर संस्थेचे भागभांडवल रु. ५,४५,७३०/-

आयुष्यात खरे प्रेम, खरी माया फार दुर्मीळ असते.

इतके झाले आहे. संस्था भांडवलात होणारी सततची वाढ ही संस्थेच्या प्रगतीस भूषणावह आहे.

**ठेवी :- (रु. ७,८६,९०,३३०.७७)**

संस्थेकडे अहवाल सालात विविध प्रकारच्या ठेवींच्या माध्यमातून ३१ मार्च २०२३ अखेर रु. ७,८६,९०,३३०.७७ इतक्या ठेवी संस्थेकडे जमा आहेत. तद्नंतर दि. ३१/०७/२०२३ अखेर त्यामध्ये आणखी भरीव वाढ होऊन या ठेवींनी ८ कोटी ९० लाख ८७ हजार ४३०.७७ चा पल्ला गाठला आहे.

**ठेवींबद्दलची सुरक्षिततता, विश्वासार्हता व आकर्षक व्याजदर यामुळे ठेवींचा ओघ सातत्याने वाढत आहे.**

ठेवी उपलब्ध करून देण्यासाठी सहभागी झालेले सर्व ठेवीदार, सभासद, बिगर सभासद, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सहकारी संस्था आणि सर्व हितचिंतक यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे आभार मानतो.

**कर्जे :- (रु. ८,०८,८७,५७५/-)**

सभासदांनी आपल्या अडचणीसाठी कर्जे काढत असताना **अन्य वित्तीय संस्थेचा पर्याय न अवलंबता आपली संस्था** मोठी झाली पाहिजे, या उदात्त भावनेने आपल्याकडीलच रु. ८,०८,८७,५७५/- इतक्या रक्कमेची कर्जाची उचल केली आहे. तद्नंतर दि. ३१/०७/२०२३ अखेर सभासदांनी केलेल्या कर्ज उचलीमुळे एकूण कर्जपुरवठा रु. ८ कोटी ७५ लाख ३२ हजार ६४५ पर्यंत पोहोचला आहे.

**ठेवीदार** जेवढा महत्त्वाचा **तितकाच कर्जदार** देखील महत्त्वाचा आहे. कारण त्यांच्याकडून मिळालेल्या व्याजावरच आपण पुढची समीकरणे मांडत असतो. म्हणूनच कर्जदार सभासदांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे आभार मानतो. तसेच सभासदांना विनंती करतो की, आपणही आपल्याच संस्थेकडे कर्जाची उचल करून संस्थेवरील विश्वास द्विगुणित करावा, ही विनंती.

**उलाढाल :- (रु. १६,३१,९६,८५८.९४)**

सन २०२२-२३ मध्ये रु. १६,३१,९६,८५८.९४(सोळा कोटी एकतीस लाख शह्याण्णव हजार आठशे अठ्ठावन्न चौऱ्याण्णव पैसे)

## नफा विभागणी :- (रु. ९१३२९६.०६)

दि. ३१/०३/२०२२ मध्ये संस्थेस निव्वळ नफा रु. ८,४०,३३४.१४/-इतका झाला होता. अहवाल सालामध्ये सर्व तरतुदी वजा जाता रु. ९,१३,२९६.०६/इतका नफा झाला आहे. नफ्यामध्ये दरवर्षी होणारी भरीव वाढ ही संस्था कामकाजास भुषणावह आहे. या निव्वळ नफ्याची विभागणी पुढीप्रमाणे व्हावी अशी व्यवस्थापक समितिची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड (राखीव निधी) २५% | रु. २,२८,३२४.०० |
| डिव्हीडंड (लाभांश) | रु. ७७,६७५.०० |
| धर्मादाय निधी | रु. ५,०००.०० |
| इमारत निधी (फंड) | रु. ४,५०,०००.०० |
| बुडित फंड | रु. २५,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. १,२७,२९७.०६ |
| **एकूण...** | **रु. ९,१३,२९६.०६** |

## संचालक मंडळ सभा :- (१४)

अहवाल सालात व्यवस्थापक समितीच्या एकूण १४ सभा झाल्या. या सभांमधील सर्व ठराव सर्वानुमते मंजूर झालेले आहेत.

संस्था कामकाजास मदत व मार्गदर्शन करणारे

### पार्लमेंटरी बोर्ड सदस्य

सर्वश्री श्री. विष्णू ऊ. काटकर–अध्यक्ष, श्री. शिवाजी नि. खाडे–उपाध्यक्ष, श्री. एकनाथ बा. पाटील, श्री. काशिनाथ ए. कुंभार, श्री. मारुती सो. माने, श्री. बजरंग रा. कुलगुडे, श्री. अर्जुन र. कराड.

### सल्लागार सदय्य

सर्वश्री श्री. नारायण य. वडाम, श्री. निवृत्ती ल. गावडे, श्री. संजय शि. बुड्डे, श्री. राजगोंडा बा. चिंचणे, श्री. नंदकिशोर वि. देसाई, श्री. सिताराम मा. मोरे, श्री. जयवंत ज. शिंदे, श्री. संभाजी ग. कांबळे, श्री. सचिन पा. कांबळे, श्री. निवास ज्ञा. सुतार

**मी स्वतः संस्थापक चेअरमन या नात्याने जबाबदारीने अविरत परिश्रम घेऊन श्रद्धेने व निष्ठेने काम करीत** असताना

**यश न मिळणे याचा अर्थ अपयशी होणे असा नाही.**

संस्था प्रगतीपथावर आणण्यासाठी **सर्व संचालक मंडळ, सभासद व ठेवीदार** यांनी केलेले **सहकार्य व योगदान** तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या संस्थेचा कारभार हा स्वच्छ व पारदर्शक आणि अत्यंत काटकसरीने केलेला आहे हे स्पष्ट करताना मला व्यक्तिश: अभिमान वाटतो.

## संस्थेच्या उल्लेखनीय बाबी

**विशेष आभार :-** ०४/०७/२०२२ रोजी पार पडलेल्या शिक्षक बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत आपल्या संस्थेच्या सभासद, ठेवीदार व सर्व हितचिंतक आणि मला निवडणूक आणणेसाठी शर्थीचे प्रयत्न करुन सर्वांनी सामुदायीक ताकद दिल्यामुळे अटीतटीचा सामना असतानाही करवीर मधुन शिक्षक बँकेसाठीचा माझा ऐतिहासिक विजय तुमच्या पाठबळामुळे खेचून आणता आला. त्यामुळे "भगवान के पास देर है लेकिन अंधेर नही" हे सिद्ध केलत. याबद्दल तुम्हा सर्वांच्या प्रति ऋण व्यक्त करुन यासाठी ईश्वर चरणी प्रार्थना करतो

**विशेष बाब :-** लॅपटॉपसाठी बिनव्याजी कर्ज योजना, सेवा निवृत्त सभासदांना रु. ३ लाख कर्ज देणारी योजना तसेच शिक्षकांच्या पगार विलंबाच्या कालावधीत प्रत्येक सभासदाला बिनव्याजी व विनाकपात एकरकमी रु.१००००/- देणारी जिल्हयातील ही पहिली सहकारी संस्था आहे. याचा आम्हास रास्त अभिमान आहे.

**सभासद प्रॉव्हिडंड फंड (PF) :-**

जिल्हा परिषदेच्या प्रॉव्हिडंड फंडच्या निकषानुसार व त्याच्या पेक्षाही भरघोस फायदा असलेली ही योजना ऑक्टोबर २०१७ पासून लागू झाली आहे. सभासदांच्या मागणीनुसार वैयक्तिक रु. ५००/- च्या पटीत सदर फंडात तुम्हाला रक्कम जमा करता येईल. या रक्कमेवर कायमस्वरूपी कर्जाच्या व्याज दराच्या १.५% कमी दराने व्याज दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ उठविण्यासाठी आतापर्यंत ७५% सभासद शिक्षकांनी यामध्ये ५०० ते ५००० च्या पटीत गुंतवणूक केली आहे. उर्वरित सभासदांनीही याचा फायदा घ्यावा. **ही योजना चक्रवाढ व्याजाच्या दराने सभासदांना लाभ मिळवून देते.**

**सभासद कल्याण ठेव :-**

संस्थेचा सभासद सेवेत असताना मृत्यू झालेस त्याच्या मृत्यूनंतर त्याचे काही कर्ज नसेल तर संस्था त्याच्या वारसास

मयत सभासद कल्याण ठेवीतून त्याच्या जमा रक्कमेच्या पाचपट रक्कम तात्काळ त्या सभासदाला दिली जाणार आहे. यासाठी प्रत्येक सभासदाकडून रु. ४०,०००/- सभासद कल्याण ठेवीमध्ये टप्प्याटप्प्याने जमा करून घेतले जाणार आहेत. सध्या या ठेवीत प्रत्येक सभासदाचे रु. १०,०००/- प्रमाणे रक्कमा जमा आहेत. मात्र सेवानिवृत्तीनंतर जमा रक्कम सभासदांना त्या वर्षीच्या ठेवीच्या व्याज दराने परत दिली जाणार आहे.

**दिवाळी भेट :-**

सभासदांनी संस्थेवर ठेवलेला विश्वास व दिलेले पाठबळ याचा विचार करूनच संस्थेने पहिल्या वर्षापासून सभासदांना दिवाळी भेटवस्तू देण्याचा पायंडा पाडला व त्यात सातत्य ठेवत यावर्षी सुद्धा प्रत्येक सभासदाला दिवाळी भेट वस्तू देण्यासाठी संचालक मंडळाचा मानस आहे.

**शासकीय ऑडीट :- (वर्ग 'अ')**

आपल्या संस्थेचे दि. ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ अखेरचे शासकीय ऑडीट, प्रमाणित लेखापरिक्षक श्री. व्ही. बी. चव्हाण यांनी केले असून दप्तरी कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी केलेले मार्गदर्शन व मौलिक सूचनेबद्दल त्यांचे व त्यांचे सहकारी यांचे मन:पूर्वक आभार !

संस्थेला सन २०२२ - २०२३ सालात **ऑडीट वर्ग 'अ'** मिळालेला आहे.

**आभार :-**

संस्था स्थापनेसाठी ज्यांनी सर्वच पातळ्यांवर खंबीर साथ व पाठबळ दिले ते आमचे सर्वेसर्वा विद्यमान आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष व सलग २० वर्षे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविलेले भोगावती सहकारी साखर कारखान्याचे **विद्यमान चेअरमन मा. श्री. पी. एन्. पाटीलसो (सडोलीकर)** तसेच कोल्हापूरचे माजी पालकमंत्री आणि गृह व परिवहन मंत्री **मा.श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, शिक्षक आमदार मा. जयंत पाटील करवीरचे विद्यामान उपनिबंधक मा. प्रेमदास राठोड,** सरपिराजीराव पतसंस्थेचे कागलचे चेअरमन, व्हा. चेअरमन तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ

व व्यवस्थापक, कोल्हापूर महानगरपालिका खाजगी शिक्षक सेवक पतसंस्था मर्या. कोल्हापूरचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ व व्यवस्थापक तसेच मा. पी. सी. पाटील गुरुजी शिक्षक पतसंस्था, गडहिंग्लजचे चेअरमन, व्हा. चेअरमन व व्यवस्थापक, करवीर तालुका पंचायत समिती कर्मचारी पतसंस्था, चेअरमन, व्हा.चेअरमन व व्यवस्थापक या सर्वांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच शालार्थ वेतन प्रणालीद्वारे संस्थेकडे वसुल पाठवण्यास सहकार्य करणारे गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शालार्थ समन्वयक यांचेही मी या प्रसंगी विशेष आभार मानतो.

**अभिनंदन :-**

जे सभासद व सभासदांचे पाल्य यांनी अहवाल सालात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपल्या कार्याचा ठसा उमटवलेला आहे, त्या सर्वांचे संस्थेच्या वतीने हर्दिक अभिनंदन !

**समारोप :-**

संस्थेच्या उज्वल भविष्यासाठी आपण संस्थापक चेअरमन श्री. एस्. व्ही. पाटील व संचालक मंडळावरील **आपला विश्वास आणखी दृढ करून परिपूर्ण सहकार्य करावे ही अपेक्षा व्यक्त करतो** व चालू सन २०२२-२०२३ या सालातील तेरीज, ताळेबंद, नफा-तोटा, नफा विभागणी व मागणी बजेट संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या वतीने आपणासमोर मंजुरीसाठी सादर करीत आहे. त्यास आपण सर्वानुमते मंजुरी द्यावी, ही विनंती.

व्यवस्थापक समितीच्या वतीने
आपला नम्र,
**श्री. सात्ताप्पा विष्णू पाटील (एस्.व्ही.)**
प्रेसिडेंट
छ. शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

आपले सौख्य हे आपल्या विचारावर अवलंबून असते.

# छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

## ताळेबंद पत्रक नं. २ दि. ३/०३/२०२३ अखेर

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | भांडवल व देणी | पोट रक्कम रुपये पैसे | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| २५,००,०००.०० | अधिकृत भाग भांडवल | | २५,००,०००.०० |
| ५,१७,८३०.०० | वसुल भाग भांडवल | | ५,४५,७३०.०० |
| ५,१७,८३०.०० | मेंबर शेअर्स | ५,४५,७३०.०० | |
| २६,३२,३५८.९३ | राखीव व इतर निधी | | ३४,४२,९५२.८७ |
| ६,८९,५२१.९७ | राखीव निधी | ९,००,५०५.२० | |
| १५,००,५१८.६५ | इमारत निधी | १९,८३,५१८.६५ | |
| ३०,०००.०० | धर्मादाय निधी | ३५,०००.०० | |
| १,७१,५३३.०० | बुडीत निधी | १,९६,५३३.०० | |
| २,४०,७८५.३१ | सभासद कल्याण निधी | ३,२७,३९६.०२ | |
| ६,८७,९२,७२८.१९ | ठेवी | | ७,८६,९०,३३०.७७ |
| १६,८६,५००.०० | सभासद कल्याण ठेव | २६,३१,५००.०० | |
| ५२,५५,४६९.०० | मासिक वर्गणी | ५५,६४,६४३.०० | |
| ५,१९,९६,१७६.०० | मुदत ठेव | ५,७०,६०,७०९.०० | |
| २४,४१,१७७.०० | रिकरींग ठेव | २७,३९,९३५.०० | |
| ४५,०९,४४०.०० | कायंम ठेव | ५२,९१,९९०.०० | |
| १०,९१,१८०.१९ | सेव्हिंग ठेव | ३३,०४,३५३.७७ | |
| २,१८,१४७.०० | दामदुप्पट ठेव | २,३७,८९५.०० | |
| १५,४०,००६.०० | भविष्यनिर्वाह ठेव | १६,९२,३६७.०० | |
| ५४,६३३.०० | सेव्हिंग ठेव ब वर्ग | १,६६,९३८.०० | |
| ३७,९२,३५२.०० | देणी | | ३२,७३,८५२.०० |
| ४,०९,३६६.०० | देणे रिकरिंग व्याज | ४,२९,३६६.०० | |
| ३,८६,६०१.०० | देणे वर्गणी व्याज | ४,२०,४३९.०० | |
| २,९१,२६८.०० | देणे कायम ठेव व्याज | ३,६०,७५६.०० | |
| २६,५५,११७.०० | देणे मुदत ठेव व्याज | १९,६३,३९१.०० | |
| | देणे टॅक्स कन्स. फी | ५,०००.०० | |
| | देणे संचालक मि. भत्ता | १४,४००.०० | |
| | नाममात्र सभासद | ५,०००..०० | |
| ५०,०००.०० | देणे ऑडीट फी | ५,५०००.०० | |
| | देणे सॉफ्ट. दे. खर्च | १०,०००.०० | |
| | देणे हार्ड. दे. खर्च | १५,०००.०० | |
| ९८६८२.०० | तरतूदी | | १,६६,६८२.०० |
| ९८६८२.०० | एन.पी.ए.तरतूद | १,६६,६८२.०० | |
| ८,४०,३३२.९४ | नफा-तोटा खाते | | ९,१३,२९६.०६ |
| ८,४०,३३२.९४ | मागील नफा (३१/०३/२२) | | |
| | चालू नफा (३१/०३/२३) | ९,१३,२९६.०६ | |
| ७,६६,७४,२८४.०६ | एकूण | ८७,३२,८४३.७० | ८७,३२,८४३.७० |

**येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२३**

श्री. मनोज नामदेवराव माळवदकर — मॅनेजर

श्री. साताप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.) — चेअरमन

श्री. बाबूराव रामचंद्र खोत (व्हा. चेअरमन)

**प्रार्थना म्हणजे ईश्वराच्या जवळ जाण्याची शक्ती होय.**

# छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

## ताळेबंद पत्रक नं. २ दि. ३/०३/२०२३ अखेर

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | मालमत्ता व येणी | पोट रक्कम रुपये पैसे | ३१/03/2023 रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १३,०५,८७६.०६ | **रोख व बँक शिल्लक** | | ७,७९,०८७.७० |
| ३३,०६१.०० | रोख शिल्लक | ८,९६३.00 | |
| ११,३३,०४१.०६ | केडीसीसी बँक | ५,१५,६६0.७0 | |
| १,३९,७७४.०० | प्राथ.शिक्षक बँक चालू | २,५४,४६४.00 | |
| ३३,००,०००.०० | **गुंतवणूक** | | ५२,३१,४४२.00 |
| --- | शिक्षक बँक मु.ठेव | - | |
| ८,००,०००.०० | केडीसीसी बँक मु.ठेव | २५,00,000.00 | |
| २५,००,०००.०० | क.ता.पं.स.कर्म.सह. पतठेव | २७,३१,४४२.00 | |
| ७,१०,६७,६७२.०० | **मेंबर कर्ज** | | ८,०८,८७,५७५.00 |
| ६,७९,८४,००७.०० | रेग्युलर कर्ज | ७,५३,९१,१४२.00 | |
| २६,३८,६६५.०० | आकस्मिक कर्ज | ४२,९४,0३0.00 | |
| ५०,०००.०० | ठेवतारण कर्ज | १२,0२,४0३.00 | |
| ३,९५,०००.०० | मध्यममुदत कर्ज | - | |
| ३९,४४४.०० | **मालमत्ता** | | ४९,३१३.00 |
| ३९,४४४.०० | डेडस्टॉक | ४९३१३.00 | |
| ९,६१,२९२.०० | **इतर येणी** | | ८५४२६.00 |
| २०,०००.०० | ऑफीस डिपॉजीट | २0,000.00 | |
| ८,८०,५११.०० | कर्जावरील येणे व्याज | - | |
| ६०,७८१.०० | येणे गुंतवणुकीवरील व्याज | ४५,४२६.00 | |
| | निवडणुक डिपाझीट | २0,000.00 | |
| ७,६६,७४,२८४.०६ | **एकूण** | | ८,७०,३२,८४३.७० |

**येणेप्रमाणे असे दि. ३१/0३/२0२३**

श्री. मनोज नामदेवराव माळवदकर — मॅनेजर

श्री. सातप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.) — चेअरमन

**श्री. बाबूराव रामचंद्र खोत**
(व्हा. चेअरमन)

**जो गुरु असेल तो शिष्य असेलच असे नाही.**

# छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

## नफातोटा पत्रक नं. दि. ०१/४/२०२२ ते ३१/०३/२०२३ अखेर

| उत्पन्न तपशील | रक्कम रुपये पैसे | खर्च तपशील | रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|
| सरळ व्याज | ७९६३४७0.00 | मुदत ठेव व्याज | ५१,२३,१४८.00 |
| प्रवेश फी | - | रिकरींग ठेव व्याज | २,४५,६५४.00 |
| फॉर्म फी | ६१00.00 | मासिक वर्गणी व्याज | ४,७५,४४0.00 |
| गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज | २२५८८४.00 | कायम ठेव व्याज | ३,६0,७५७.00 |
| | | सादिलवार | २५,८00,00 |
| | | बँक कमिशन/चार्जेस | ४0२.९४ |
| | | इमारत भाडे | ४५,000.00 |
| | | घसारा | १0,५२१.00 |
| | | नोकर पगार | १,६७,८00.00 |
| | | प्रिंटींग स्टेशनरी | २४,३२७.00 |
| | | प्रवास खर्च | ११,२९0.00 |
| | | जनरल सभा खर्च | ८८,९८३.00 |
| | | सत्कार समारंभ खर्च | १५,१३९.00 |
| | | जाहिरात | २३,५00.00 |
| | | भविष्यनिधी ठेव व्याज | १,४३,३0१.00 |
| | | लाईट बील | २,६४0.00 |
| | | सभासद दिपावली भेटवस्तू | १,८३,६0८.00 |
| | | मानधन | १५,२00.00 |
| | | ऑडीट फी | ५६३३७.00 |
| | | सेव्हिंग ठेव व्याज | ४0,१३५.00 |
| | | दामदुप्पट ठेव व्याज | १९,७४८.00 |
| | | ऑफीस खर्च | १९,११५.00 |
| | | संगणक दुरुस्ती | १0,000.00 |
| | | अहवाल छपाई खर्च | १६,७00.00 |
| | | टॅक्स कन्सल्टींग फी | ५,000,00 |
| | | सॉफ्टवेअर देखभाल खर्च | १0,३२0,00 |
| | | हार्डवेअर देखभाल खर्च | १५,000.00 |
| | | एन.पी.ए. तरतुद खर्च | ६८,000,00 |
| | | जि एस टी | १८,५४१,00 |
| | | सी एस टी | १८,५४१,00 |
| | | संचालक मिटींग भत्ता | १५,६00,00 |
| | | निवडणुक खर्च | २२,४५0.00 |
| | | नफा | ९,१३,२९६.0६ |
| एकूण | ८१,९५,३९४.00 | | ८१,९५,३९४.00 |

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२३

श्री. मनोज नामदेवराव माळवदकर
मॅनेजर

श्री. सातापा विष्णू पाटील (एस.व्ही.)
चेअरमन

श्री. बाबूराव रामचंद्र खोत
(व्हा. चेअरमन)

**हृदयावर अपार प्रेम असले की सर्वत्र मित्र लाभतात.**

## सन २०२३-२४ सालाकरीता उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक

| अंदाजे उत्पन्न | रक्कम | अंदाजे खर्च | रक्कम |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | ९१00000 | ठेवीवरील व्याज | ७३,००,००० |
| गुंतवणुकीवरील व्याज | २00000 | बँक चार्जेस | १,००० |
| इतर उत्पन्न | 10000 | इमारत भाडे | ६०,००० |
| | | घसारा | १५,००० |
| | | नोकर पगार | २,४०,००० |
| | | प्रिंटींग स्टेशनरी | ३०,००० |
| | | प्रवास खर्च | ४०,००० |
| | | जनरल सभा खर्च | ८०,००० |
| | | सत्कार समारंभ खर्च | ५०,००० |
| | | जाहिरात | ३०,००० |
| | | दीपावली भेट वस्तू | २,५०,००० |
| | | मानधन | ४५,००० |
| | | ऑडिट फी | ६०,००० |
| | | ऑफिस खर्च | ५०,००० |
| | | देणगी | १०,००० |
| | | टॅक्स कन्सल्टींग फी | ५,००० |
| | | सॉफ्टवेअर देखभाल खर्च | १५,००० |
| | | हार्डवेअर देखभाल खर्च | १०,००० |
| | | संचालक मिटींग भत्ता | १५,००० |
| | | अंदाजे नफा | १०,०४,००० |
| एकूण | ९३,१०,००० | एकूण | ९३,१०,००० |

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२३

श्री. मनोज नामदेवराव माळवदकर — मॅनेजर
श्री. साताप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.) — चेअरमन

श्री. बाबूराव रामचंद्र रावोत
(व्हा. चेअरमन)

जीवन जगण्याची कला हीच सर्व कलांमध्ये श्रेष्ठ आहे.

# छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

## संस्था प्रगतीचा अहवाल (आकडे लाखात)

| अंदाजे उत्पन्न | २०१७–२०१८ | २०१८–२०१९ | २०१९–२०२० | २०२०–२०२१ | २०२१–२०२२ | २०२२-२०२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| सभासद | २५८ | २६४ | २८५ | २९० | ३१० | ३३२ |
| शेअर भांडवल | ३.४९ | ३.८० | ४.३४ | ४.८९ | ५.१७ | ५.४५ |
| निधी | १.३८ | ५.१६ | २०.१६ | २७.६६ | २६.३२ | ३४.४२ |
| ठेव | ३७०.० | ४७७.०० | ५९०.०० | ७५१.०० | ७७५.०० | ७८६.९० |
| गुंतवणूक | २१.०० | ४९.०० | १९.४६ | २०.०० | ३३.०० | ५२.३१ |
| कर्जे | ३५०.०० | ४५५.०० | ५७५.०० | ७३६.०० | ७४२.०० | ८०८.८७ |
| खेळते भांडवल | २८७.७६ | ४०७.२५ | ५३८.४३ | ६६२.७२ | ७६६.७४ | ८७०.३२ |
| नफा लाभांश | ५.२३ | ६.१३ | ६.९६ | ७.४४ | ८.४० | ९.१३ |
| (डिव्हिडंड) | १०% | ११% | १२% | १२% | १३% | १४% |
| ऑडिट वर्ग | ‘अ’ | ‘अ’ | ‘अ’ | ‘अ’ | ‘अ’ | ‘अ’ |

**कामकाजाची वेळ**

**सोमवार ते शुक्रवार – दुपारी १२ ते ६**

**साप्ताहिक सुट्टी – गुरुवार**

**संपर्क नंबर**

**श्री. एस्.व्ही.पाटील : ९४२०४५९२९२**

**श्री. मनोज माळवदकर : ९५१८५७२०२७**

वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन

# लेखापरिक्षकाचा अहवाल

छ. शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर या संस्थेचे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरीक्षण केलेले असून त्यामध्ये ३१/०३/२०२३ या दिनांकाचा ताळेबंद त्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीमधील नफातोटा पत्रक/ उत्पन्न खर्च पत्रक आणि त्यामध्ये समाविष्ट केलेल्या हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

मी असा अहवाल करतो की,

अ) लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे आणि विश्वासानुसार आम्हांस जरुर ती सर्व माहिती आणि खुलासे उपलब्ध झालेले आहेत आणि ते समाधानकारक आहेत

ब) आमच्या तपासणीतून जीतपत दृष्टोत्पतीस येईल त्याप्रमाणे संस्थेने केलेले व आम्ही तपासलेले सर्व व्यवहार संस्था अधिकाराच्या मर्यादितच केलेले आहेत.

क) लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठीची संस्थेच्या शाखा आणि कार्यालयाकडून प्राप्त झालेली विवरण पत्रके परिपूर्ण आहेत.

आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक/उत्पन्न खर्च पत्रक यांचे अनुपालन लेखांकन माणकाप्रमाणे आहे.

मी असा अहवाल करतो की,

१) अहवालासोबत जोडलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक/उत्पन्न खर्च पत्रके ही संस्थेच्या हिशोब पुस्तके व विवरण पत्रकांशी सुसंगत आहेत.

२) आमच्या मते व आमच्या दप्तर तपासणीत जितपत दृष्टोत्पतीस येईल त्याप्रमाणे संस्थेने कायद्यानुसार आवश्यक व योग्य ती सर्व हिशोब पुस्तके ठेवली आहेत.

३) शाखांच्या जमाखर्चाचे लेखापरिक्षकांनी तपासलेले अहवाल आमच्या आवश्यकतेप्रमाणे व अहवाल तयार करणेच्या गरजेनुसार विचारात घेतले असून सुसंगत आहेत.

४) संस्थेस चालू तपासणी कालावधीसाठी ऑडिट वर्ग 'अ' देणेत आला आहे.

लेखापरिक्षक नामतालिका नंबर : १६३८२

ठिकाण : कोल्हापूर

**श्री. व्ही. बी. चव्हाण**
प्रमाणित लेखापरिक्षक

**दिनांक** : ३०/०६/२०२३

वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन

## कर्ज प्रकरणास लागणारी कागदपत्रे

१) केंद्र मुख्याध्यापक / केंद्र प्रमुख यांचे सहीचा पगार दाखला.
२) दोन जामिनदार (थकबाकी नसणारे)
३) सात पावती तिकिटे.
४) रुपये १००/– चा स्टॅम्प जोडणे आवश्यक.
५) कर्जदार यांचे दोन कोरे चेक.
६) इतर संस्थांचा ना हरकत दाखला.
७) कर्जदार व जामिनदार यांचे आधार कार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र सत्य प्रत (कोणतेही एक) आवश्यक.

## नवीन सभासद होणेसाठी लागणारी कागदपत्रे

१) सभासद होणेसाठी अर्ज.
२) नोकरीचा मुळ नेमणुक आदेश.
३) केंद्र प्रमुख / केंद्र मुख्याध्यापक यांचा दाखला.
४) रेशनकार्ड सत्य प्रत.
५) पासपोर्ट साईज २ फोटो.
६) आधार कार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र (कोणतेही एक) सत्य प्रत आवश्यक.
७) शेअर अनामत रक्कम भरावी लागेल.

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२३

श्री. मनोज नामदेवराव माळवदकर
मॅनेजर

श्री. सातापा विष्णू पाटील (एस.व्ही.)
चेअरमन

श्री. बाबुराव रामचंद्र खोत (व्हा. चेअरमन)

**वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन**